महाराष्ट्र शासन

सत्यमेव जयते

**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,**
**२८, क्वीन्स गार्डन, जुने सर्किट हाऊस जवळ, पुणे- ४११००१**
**Website: trti.maharashtra.gov.in**
दुरध्वनी- ०२०-२६३३०८५४

TRTI

संशोधनं कल्याणम्

MAHARASHTRA STATE PUNE

## अनुसूचित जमातीच्या उमेदवारांकडून केंद्रीय लोकसेवा आयोग -नागरी सेवा मुख्य परीक्षा २०२५ तयारीकरीता प्रोत्साहनपर आर्थिक सहाय्य (सानुग्रह) योजना

आदिवासीसंशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीचे जे उमेदवार केंद्रीय लोकसेवा आयोग - नागरी सेवा पूर्व परीक्षा २०२५ उत्तीर्ण झाले आहेत अशा उमेदवारांना मुख्य परीक्षेच्या तयारीकरीता प्रोत्साहनपर आर्थिक सहाय्य (सानुग्रह) प्रदान करण्यात येणार आहे.

- **योजनेचे स्वरूप**
  पात्र अनुसूचित जमातीच्या उमेदवारांना एकरकमी रक्कम रु.५०,०००/- आर्थिक सहाय्य (सानुग्रह) दिले जाईल.
- **पात्रता**
  १. उमेदवार महाराष्ट्र राज्याचा रहिवासी व अनुसूचित जमातीचा असावा.
  २. उमेदवाराची जमात ही महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीच्या यादी मधील असणे आवश्यक.
  ३. उमेदवाराकडे अनुसूचित जमातीचे जमात वैधता प्रमाणपत्र असणे अनिवार्य आहे.
  ४. शासकीय सेवेत असणाऱ्या उमेदवारास ह्या योजनेचा लाभ घेता येणार नाही.
  ५. उमेदवाराच्या कुटुंबाचेवार्षिक उत्पन्न रुपये आठ लाखापेक्षा कमी असावे.
  ६. उमेदवारास या योजनेचा लाभ फक्त तीन वेळा घेता येईल. जर उमेदवाराने याआधी सदर योजनेचा तीन वेळा लाभ घेतला असेल तर सदर उमेदवार अपात्र असेल
  ७. उमेदवार दि. ११/०६/२०२५ रोजी जाहीर झालेल्या केंद्रीय लोकसेवा आयोग - नागरी सेवा पूर्व परीक्षा २०२५ उत्तीर्ण झालेला असावा.
- **अर्ज करण्यासाठी**
  १. उमेदवाराने खाली दिलेल्या लिंकवर (गुगल फॉर्म) जाऊन **दि.२४/०७/२०२५** पूर्वी ऑनलाईन अर्ज भरावा. (ऑनलाईन अर्ज भरणे बंधनकारक आहे.)
  २. या कार्यालयाच्या संकेतस्थळावर https://trti.maharashtra.gov.in/ सदर योजनेकरीता गुगल फॉर्मची लिंक उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.
  ३. संपूर्ण अर्ज व्यवस्थित व अचूक भरल्याची खात्री केल्यानंतरच उमेदवाराने अर्ज सादर करावा.
  ४. अपूर्ण माहिती भरल्यास अथवा माहिती लपवल्यास, कोणत्याही टप्प्यावर सदर लाभ या कार्यालया मार्फत रद्द करण्यात येईल व आर्थिक सहाय्य (सानुग्रह) ची संपूर्ण रक्कम उमेदवाराकडून वसूल करण्यात येईल.
  ५. उमेदवाराने वेगवेगळी माहिती भरून एकापेक्षा जास्त वेळा अर्ज भरल्यास लाभ रद्द करण्यात येईल.
  ६. ऑनलाईन अर्जाव्यतिरिक्त उमेदवाराने सदर जाहिरातीसोबत जोडलेला अर्ज अचूक भरून अर्जासोबत खालील नमूद केलेल्या कागदपत्रांची स्व-साक्षांकित एक प्रत (हार्ड कॉपी) आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे या कार्यालयास पोस्ट/कुरियर द्वारा किंवा प्रत्यक्ष **दि.२४/०७/२०२५** रोजी संध्याकाळी ५ वाजेपर्यंत पाठवावी/ जमा करावी.

**(कागदपत्रांच्या पाकिटावर'युपीएससी - नागरी सेवा मुख्य परीक्षा २०२५ करीता आर्थिक सहाय्य' असे नमूद करावे.)**

- ✓ अनुसूचित जमातीचे जमात प्रमाणपत्र
- ✓ अनुसूचित जमातीचे जमात वैधता प्रमाणपत्र
- ✓ रहिवास दाखला(डोमासाईल प्रमाणपत्र)
- ✓ युपीएससी - नागरी सेवा पूर्व परीक्षा २०२५चे प्रवेश पत्र
- ✓ DAF फॉर्म ची छायांकित प्रत
- ✓ आधारकार्ड
- ✓ तहसिलदाराने निर्गमित केलेला वार्षिक उत्पनाचा दाखला (आर्थिक वर्ष सन २०२३-२४)
- ✓ कोणत्याही राष्ट्रीयकृत बँक पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत (बँक खाते फक्त अर्जदाराच्या नावानेच असावे. पालक/नातेवाईक/ मित्र यांच्या बँक खात्याचा तपशील दिल्यास अर्जदाराची उमेदवारी रद्द करण्यात येईल.)

सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी दोन्ही स्वरुपात (ऑनलाईन व ऑफलाईन) अर्ज करणे बंधनकारक आहे.

- **अर्ज पाठविण्यासाठीचा पत्ता :**
  आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे २८, क्वीन्स गार्डन, जुने सर्किट हाऊस जवळ,पुणे- ४११००१
- **अधिक माहितीसाठी:** ०२०-२६३३०८५४

(समीर कुर्तकोटी,भा.प्र.से)
**आयुक्त,**
**आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे**